## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ फेब्रुवारी २०२०

## अधिसूचना

**महाराष्ट्र प्रसुती विषयक लाभ नियम, १९६५.**

क्रमांक प्रलानि-२०१८/प्र.क्र.१२८/काम-७.—महाराष्ट्र प्रसुतिलाभ नियम, १९६५ सुधारित करण्याच्या अनुषंगाने प्रसुतिविषयक लाभ अधिनियम, १९६१ (१९६१ चा ५३) च्या कलम २८ आणि इतर सर्व सक्षम प्राधिकाराद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा उपयोग करून जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केले आहे त्याजोगे या अधिसूचनेचा पुढील मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम २८ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यामुळे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तीच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** सदरहू अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त मसुदा विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याच्या संबंधात उपरोक्त कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तिकडून जे कोणतेही अभिवेदन कामगार आयुक्त, कामगार भवन, ई ब्लॉक, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ यांचेमार्फत येईल ते शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

### मसुदा अधिसूचना

१. या नियमांना महाराष्ट्र प्रसुतिविषयक लाभ नियम (सुधारणा), २०२० असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र प्रसुतिविषयक लाभ नियम, १९६५ मधील नियम ६ नंतर खालील नियम अंतर्भूत होईल.—

"६ अ पाळणाघर.—कलम ११ अ नुसार पन्नास किंवा त्याहून अधिक कर्मचारी असणाऱ्या प्रत्येक आस्थापनेमध्ये पाळणाघराची सुविधा आस्थापनेच्या प्रवेशद्वारापासून पाचशे मीटर अंतराच्या आत पुरवली जाईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श. मा. साठे,**
शासनाचे उप सचिव.

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, No. PLN-2018 / CR-53 / Lab-7, dated 11 February 2020 published in the *Maharashtra Government Gazette,* Part I-L, Extra Ordinary is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. M. SATHE,
Deputy Secretary to Government.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032.
Dated 11th February 2020.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MATERNITY BENEFIT RULE, 1965.

No. PLN 2018 /C.R.128/Lab-7.—The following draft of rules further to amend the Maharashtra Maternity Benefit Rules, 1965 which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by Section 28 of the Maternity Benefit Act, 1961 (53 of 1961) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub section (*1*) of section 28 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after the expiry of Sixty days from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette.*

2. Any objections or suggestions, which may be received by the Commissioner of Labour, Maharashtra State, E-Block, C-20, Kamgar Bhavan, Bandra-Kurla Complex, Mumbai-400051 from any person with respect to the said draft, before the expiry of the above mentioned period will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These Rules may be called the Maharashtra Maternity Benefit (Amendments) Rules, 2020.

2. After rule 6 of the Maharashtra Maternity Benefit following Rules,1965 the following rule shall be inserted, namely :—

"6A. *Creche*.—The facility of creche to be provided in respect of every establishment having fifty or more employees as per section 11A shall be within five hundred meters from the entrance gate of the establishment."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. M. SATHE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.